<u>नि.दि.मु.क्र.१७/२०१४ मधील नि.७६ वरील  आदेश</u>
**<u>CNRNo.MHST16000084-2014</u>**
<u>(निवृत्ती आबाजी भिलारे वि. एकनाथ कृष्णा भिलारे वगैरे)</u>

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ शंकर कृष्णा भिलारे मयत झाल्याने त्यांचे विरुध्द झालेला "अबेटमेंटचा आदेश" रद्द होण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र.४ शंकर कृष्णा भिलारे हे दिनांक २६.१०.२०२३ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.४ मयत झालेनंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी प्रतिवादी क्र.४ हे मयत झाले त्यावेळी वादी यांना त्यांच्या वारसांची माहीती नव्हती. वादी यांचे वय झाले आहे. वादीला प्रतिवादी क्र.४ चा मृत्युचा दाखल मिळण्यास उशीर झाला त्यामुळे वादीला नेमले तारखेस न्यायालयात हजर राहून प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. याशिवाय वादी यांना त्यांचे कौटुंबिक अडचणींमुळे, घरगुती समस्यांमुळे, त्यांचे आजारपणामुळे व इतर शारिरिक व्याधींमुळे प्रतिवादी क्र.४ चे वारस न्यायालयात हजर राहुन मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाहीत. वादीला वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला आहे. दाव्याचे कामकाज गुणदोषावर होण्याकरीता प्रतिवादी क्र.४ यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे असून "अबेटमेंट आदेश रद्द" होवुन मिळावा, अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जावर नि.८४ वर म्हणणे दाखल केले असून अर्जातील कथने अमान्य केली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीने अर्जामध्ये प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास व झालेल्या विलंबाबाबत तसेच अबेटमेंटबाबत जी कारणे दिली आहेत ती पुर्णपणे खोटी आहेत. प्रतिवादीना सुमारे ६ महिने पेक्षा जास्त काळ मयत होवून झाला आहे. वादी हे लोहारे गावातीलच राहवाशी असुन प्रतिवादी क्र.४ हा मयत असल्याची माहीती त्यांना आहे. अर्जात नमुद केलेला मजकुर चुकीचा आहे. दाव्याचे कामी वादी यांचा संपुर्ण पुरावा झालेला आहे व असे असतानाही जाणीवपुर्वक प्रतिवादी क्र.४ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतल्याने तसेच त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल न केल्याने वादीचा निशाणी ७६, ७८ व ८० वरील अर्ज न्यायाच्या दृष्टीने रद्द बातल करण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा निरंतर ताकीद मिळण्याकरिता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.४ हे मयत झाले आहेत. मयत शंकर कृष्णा भिलारे यांचे मृत्यूचा दाखला निशाणी ७५ वर दाखल आहे. सदर मृत्युच्या दाखल्यावरुन असे दिसून येते की प्रतिवादी क्र.४ हे दिनांक २६.१०.२०२३ रोजी मयत झाले आहेत. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे.

करीता, वादीचा अर्ज मंजुर करणे योग्य होईल. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.४ चे विरुद्ध करण्यात आलेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

ठिकाण - वाई. (सी. व्ही. शिरसाट)
दिनांक - १६.०७.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.